N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** ठाणे शहर **P.S.(ठाणे):** ठाणे नगर **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0279 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 28/12/2021 00:25 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
**Date From (दिनांक पासून):** 27/12/2021
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date To ( दिनांक पर्यंत):** 27/12/2021
**Time From (वेळेपासून):** 13:33 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:33 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/12/2021 **Time (वेळ):** 15:47 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 001 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 28/12/2021 00:25 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.5 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** मा जिल्हा व सत्र ,न्यायालय, ठाणे

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** ठाणे नगर
**District(State) (जिल्हा(राज्य)):** ठाणे शहर(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अनवर अकबर सैय्यद
**(b) Father's Name (वडील चे नाव) :** अकबर सैय्यद
**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1969 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**
**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | फ्लट नं 407, चौथा मजला,सैफ पलेस अपार्टमेंन्ट,अमतनगर, मुंब्रा, जि ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | फ्लट नं 407, चौथा मजला,सैफ पलेस अपार्टमेंन्ट,अमतनगर, मुंब्रा, जि ठाणे,मुंब्रा,ठाणे शहर, महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिलींद गणेश जोशी | | वडील का नाम : गणेश जोशी | 1. संघवी व्हली, /2, फ्लट नं 1, पारसिकनगर, कळवा प, जि ठाण,ठाणे नगर,ठाणे शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक: 27/12/2021मी अनवर अकबर सैय्यद, वय 52 वर्षे, व्यवसाय - अँम्ब्युलन्स चालक, रा. फ्लट नं. 407, चौथा मजला, सैफ पलेस अपार्टमेंन्ट, मुंब्रा इंग्लिश स्कुल जवळ, अमृतनगर, मुंब्रा, जि. ठाणे फिर्याद लिहून देतो की, माझा मुलगा तौसिफ अनवर सैय्यद याच्यावर वागळे इस्टेट पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. नं. 289/2021, भा.द.वि. कलम 326 प्रमाणे गुन्हा दाखल असुन नमुद गुन्हयात त्यास अटक करण्यात आलेली असुन सध्या तो न्यायालयीन कोठडीत आहे. त्याचा जामीन मंजुर होण्यासाठी दि. 22/12/2021 रोजी मी माझ्या पत्नीसह श्रीमती झा यांच्या न्यायालयात जावुन वागळे इस्टेट पोलीस स्टेशनमधील कोर्ट अंमलदार श्री. मिलींद जोशी यांना भेटलो. त्यावेळी श्री. मिलींद जोशी यांनी माझ्या मुलाच्या जामीनबाबतची कागदपत्रे (पोलीसांचा जामीनाबाबतचा अहवाल) मा. न्यायालयात जमा करण्यासाठी माझ्याकडे रूपये 2,000/- रक्कमेची मागणी केली. सदर घटनेवरून माझ्या लक्षात आले की, माझ्या मुलाच्या जामीनाकरीताची कागदपत्रे से मा. न्यायालयात जमा करण्यासाठी माझ्याकडे ठाणे कोर्टात असलेले वागळे इस्टेट पोलीस स्टेशन येथील कोर्ट डयुटी पोलीस अंमलदार श्री. मिलींद जोशी हे 2,000/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असून मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांच्या विरूध्द कारवाई होण्याकरीता दि. 22/12/2021 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथील पो.उप.अधी. श्री. जाधव यांच्या कार्यालयात समक्ष हजर राहून तक्रार दिली होती. माझ्या तक्रारीची पडताळणी करण्याकरीता पो.उप.अधी. श्री. जाधव यांनी अन्न व औषध प्रसासन, वागळे इस्टेट, ठाणे या कार्यालयातून दोन शासकीय पंच साक्षीदारांना पाचारण केले. पंचांच्या उपस्थितीत सर्व कायदेशीर बाबींचा अवलंब करून मला दि. 23/12/2021 रोजी लोकसेवक श्री. मिलींद जोशी यांची भेट घेण्याकरीता डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच 1 श्री. चिलवंते व माझ्या पत्नी समवेत मा. जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथील श्रीमती झा, 3 रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग पहिले न्यायालय, ठाणे यांच्या न्यायालयात पाठविण्यात आले. मी, माझी पत्नी व पंच 1 श्री. चिलवंते आम्ही सदर न्यायालयात गेलो. त्यावेळी लोकसेवक श्री. मिलींद जोशी हे कोणत्यातरी महिलेशी बोलत होते. काहीवेळाने मी श्री. मिलींद जोशी यांच्याशी माझ्या मुलाच्या जामीनाबाबत चर्चा करण्यास सुरूवात केली. त्यावेळी श्री. जोशी यांनी तपासी अधिकारी श्री. गावीत यांना फोन करून जामीनाचे कागद पाठवून देण्यास सांगतो असे बोलून श्री. गावीत यांना फोन केला. त्यानंतर श्री. गावीत हे कागद पाठवून देणार असल्याचे श्री. जोशी यांनी सांगितल्यावर माझ्या पत्नीने सदर कागद आमच्या अथवा आमच्या वकिलाच्या ताब्यात देणार का? असे विचारले असता सदर कागद ते न्यायालयात जमा करणार असल्याचे श्री. जोशी यांनी सांगितले. मी श्री. जोशी यांना माझ्या मुलाचा जामीन मंजुर होण्याकरीता काय आवश्यक आहे? याबाबत विचारले असता त्यांनी वकिलांकडे चौकशी करण्यास सांगितले. त्यानंतर मी त्यांना माझ्या पत्नीस मुलाची मुलाखत घेण्याकरीता मध्यवर्ती कारागृह येथे सोडून येतो असे सांगितले. त्यावर माझ्या पत्नीने दोन अडीच पर्यंत परत येणार असल्याचे सांगितले. त्यावर श्री. जोशी यांनी ते न्यायालयाच्या वेळेपर्यंत तेथेच

असल्याचे सांगितले. त्यानुसार पो.उप.अधी. श्री. जाधव यांनी दिलेल्या सुचनेनुसार मला पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच 1 श्री. चिलवंते व माझ्या पत्नी समवेत लोकसेवक श्री. जोशी यांची भेट घेण्याकरीता ठाणे न्यायालयात पाठविण्यात आले. आम्ही न्यायालयात जावून श्री. मिलींद जोशी यांचा शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही. त्यामुळे त्यांची भेट झाली नाही. त्यानुसार लोकसेवक श्री. जोशी यांची भेट घेण्याकरीता मी माझे मोबाईल फोन वरून लोकसेवक श्री. जोशी यांचे मोबाईलवर फोन केला. त्यावेळी लोकसेवक श्री. मिलींद जोशी हे न्यायालयात उपस्थित असल्याचे सांगून तेथेच भेटण्याकरीता बोलविले असल्याचे सांगितले. त्यावरून पो.उप.अधी. श्री. जाधव यांनी दिलेल्या सुचनेनुसार मला पुन्हा डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून पंच 1 श्री. चिलवंते व माझ्या पत्नी समवेत ठाणे न्यायालयात पाठविण्यात आले. आम्ही न्यायालयात जावून लोकसेवक श्री. जोशी यांची भेट घेतली. मी माझ्या मुलाच्या जामीनाबाबत लोकसेवक श्री. जोशी यांना विचारले असता त्यांनी तपासी अधिकारी श्री. गावीत यांनी कागद पाठविले नसल्याचे व त्यांच्याशी फोनवर चर्चा झाली असल्याचे सांगून उदया कागद पाठविणार असल्याचे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. जोशी यांनी मला पैशांची मागणी करणारा इशारा हाताने केला. माझा मुलगा रक्कम घेवून येणार असल्याचे मी त्यांना सांगून रक्कम नसेल तर G payद्वारे पैसे दिले तर चालेल का? याबाबत विचारले असता त्यांनी किती G pay करणार असे विचारले. त्यानंतर मी वकीलाचा नंबर देतो त्याच्यावर मारा पाहिजे तर G pay असे सांगितले व कोण मारेल G pay असे विचारले. त्यावर श्री. जोशी यांनी विचारा मग त्याच्याकडे आहेत का G pay वर आणि मला सांगा असे विचारल्यावर मी माझ्या मुलाकडे चौकशी करून त्याच्याकडे G pay नसल्याचे सांगून रोख रक्कम देतो असे सांगितले. दि. 22/12/2021 रोजी झालेल्या बोलणीनुसार मी तेथील टेबलावरील लाल शाईच्या पेनाने माझ्या हातावर पहिले 1500 व त्यानंतर खालील बाजूस 1000 असे आकडे लिहीले व श्री. जोशी यांना दाखविले. त्यावर श्री. जोशी यांनी मला काय? असे विचारल्यावरून मी त्यांना माझ्या हातावर लिहीलेल्या 1000 आकडयाकडे अंगुलीनिर्देश करून हे घेवून टाका असे सांगितले. त्यानंतर त्यांनी माझ्या हातावर लिहीलेला 1500 आकडा दाखवून तसेच पंधराशे असा शब्दोच्चार करून मला पण दयायला लागतात ओ. तुम्ही असा नका करून. मला पण दयायला लागतात. एव्हडयाश्या याच्यात होत नाही ते असे मला बोलले. मी त्यांना हजार रूपयांत करून टाका असे सांगितले असता त्यांनी माझ्या हातावर लिहीलेला 1500 आकडा दाखवून पहिले... पहिले असे बोलून आत्ता करताय का असे विचारले. मी त्यांना माझ्या मुलाकडे रक्कम आहे का? याबाबत खात्री करून उपलब्ध असल्यास आत्ता नाहीतर उदया देतो असे सांगितले. त्यावर त्यांनी मला उदया केल्यास ते उदया रजेवर असल्याने जामीनाची कार्यवाही सोमवारी होईल असे सांगितले. मी त्यांना उदया पेपर कोर्टात आणणार ना? याबाबत विचारले असता त्यांनी ते मी पाठवतो ना. मी  नसलो तरी तुम्हाला पेपर मिळून जातील आणि त्यानंतर तुम्ही आत्ता करा मग मी फोनवर बरोबर पेपर इथे मागवतो असे मला सांगितले. त्यावर मी पैशांची पुर्तता करून फोन करतो असे सांगितल्यावर त्यांनी मला फोनवर नका करू इथेच बोला काय ते असे सांगितले. नमुद पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. जोशी यांनी माझ्या मुलाच्या जामीनाबाबतची कागदपत्रे तपासी अधिकारी यांनी दिल्यानंतर ती न्यायालयात सादर करण्याकरीता माझ्याकडे रूपये 1500/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निषपन्न झाले. त्यावरून पो.उप.अधी. श्री. जाधव यांनी मला लोकसवेक श्री. जोशी यांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या विरूद्ध लाचेचा सापळा आजमाविण्याकरीता रूपये 1500/- रक्कम उपलब्ध आहे का? याबाबत विचारणा केली असता मी दि. 27/12/2021 रोजी पर्यंत रक्कम उपलब्ध करतो असे पो.उप.अधी. श्री. जाधव यांना सांगितल्यावरून सापळा कारवाई दि. 27/12/2021 रोजी करण्याचे ठरविण्यात आले. दि. 27/12/2021 रोजी लोकसेवक यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचेची रक्कम रूपये 1,500/- उपलब्ध झाल्याने मी रक्कमेसह अँन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयात हजर झालो. त्यानुसार सापळापूर्व कारवाई पूर्ण झाल्यानंतर लोकसेवक यांच्या विरूध्द लाचेचा सापळा आजमविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर लोकसेवक श्री. जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे मी पंच 1 श्री. चिलवंते यांच्यासह डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर लावून अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या रक्कमेसह (रूपये 1,500/-) लोकसेवक श्री. जोशी यांची भेट घेण्याकरीता ठाणे न्यायालयात गेलो. तेथे जावून लोकसेवक श्री. जोशी यांची भेट घेवून माझ्या मुलाच्या जामीनाबाबत चौकशी केली. लोकसेवक श्री. जोशी यांनी गुन्ह्याच्या तपासी अधिकारी यांचे नाव विचारल्यावरून मी श्री. गावीत साहेबांचे नाव सांगतले. त्यावर लोकसेवक श्री. जोशी यांनी श्री. गावीत साहेबांना फोन करून माझा मुलगा तौसिफ याच्या से बाबत विचारणा केली व मला श्री. गावीत साहेब आज से पाठविणार असल्याचे सांगितले. मी त्यांना आज किंवा उदया जामीन होईल ना याबाबत विचारणा केली असता त्यांनी से प्राप्त झाल्यानंतर जामीन होईल असे सांगितले. लोकसेवक श्री. जोशी हे कक्षाच्या बाहेर लॉबीच्या गेटजवळ आले मी देखील त्यांच्या मागोमाग येवून माझ्या मुलाच्या जामीनाबाबत चर्चा केल्यानंतर लोकसेवक श्री. जोशी यांनी मला लाचेच्या रक्कमेची हाताने खुणावून मागणी केल्याने मी त्यांना इथेच देवू का आतमध्ये असे विचारले. त्यावर श्री. जोशी यांनी दया इथे आत नाही असे मला बोलले. त्यानुसार मी माझ्या पन्टच्या उजव्या खिशातील अँन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम रूपये 1,500/- लोकसेवक श्री. जोशी यांच्या समक्ष धरून पंधरा आहेत मोजून घ्या असे सांगितले. त्यावरून लोकसेवक श्री. जोशी यांनी सदर रक्कम डाव्या हाताने स्विकारून त्यांनी परिधान केलेल्या पन्टच्या डाव्या खिशामध्ये ठेवून दिली. त्यावेळी मी सापळा पथकास लाचेच्या स्विकार झाल्याबाबत पूर्वनियोजित इशारा केल्यावरून सापळा पथकाने लोकसेवक श्री. जोशी याना 13.33 वाजता रंगेहात पकडले. सदरची रक्कम त्यांच्या पन्टच्या डाव्या खिशामधून हस्तगत करण्यात आलेली आहे. सापळापूर्व कारवाई दरम्यान लिहिलेल्या नोटांचे क्रमांक व हस्तगत लाच रक्कमेतील नोटांचे क्रमांक पडताळले असता ते जुळून आले. अल्ट्राव्हॉयलेट दिव्याच्या प्रकाशात केलेल्या तपासणीमध्ये लाचेच्या नोटांवर तसेच लोकसेवक श्री. जोशी यांच्या डाव्या तळहातावर व बोटांवर अँन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म आढळून आले असल्याचे सापळा पथकाने पंचांना दाखवून दिले. अशा प्रकारे लोकसेवक मिलींद गणेश जोशी, वय 41 वर्षे, पोलीस नाईक/3635, नेमणूक - वागळे इस्टेट पोलीस स्टेशन, ठाणे शहर (वर्ग 3), रा. संघवी व्हली, /2, फ्लट नं. 102, पारसिकनगर, कळवा (प.), जि. ठाणे यांनी लोकसेवक या नात्याने त्यांना मिळालेल्या अधिकाराचा व पदाचा दुरूपयोग करून माझा मुलगा तौसिफ अनवर सैय्यद याच्याविरूध्द वागळे इस्टेट पोलीस स्टेशन, येथे दाखल गुन्हा रजि. नं. 289/2021 या गुन्हयामध्ये मुलाच्या जामीनाबाबत तपासी अधिकारी यांचा जामीनाबाबतचा अहवाल मा. न्यायालयात जमा करण्याकरीता दि. 23/12/2021 रोजी पडताळणी दरम्यान रूपये 1,500/- रक्कमेच्या लाचेची मागणी करून दि. 27/12/2021 रोजी 13.33 वा. मा.जिल्हा व सत्र न्यायालय, ठाणे येथे माझ्याकडून रूपये 1,500/- लाचेची रक्कम स्विकारली म्हणून लोकसेवक श्री. मिलींद गणेश जोशी, वय 41 वर्षे, पोलीस नाईक/3635 , नेमणुक - वागळे इस्टेट पोलीस स्टेशन, ठाणे शहर (वर्ग 3) यांच्या विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): JAYRAJ NARSINGRAO RANAVARE(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची)

**Name** (नाव): JAYRAJ NARSINGRAO RANAVA

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**